# १३. भारत, श्रीलंका आणि आग्नेय आशिया

१३.१ भारत आणि श्रीलंका
१३.२ भारत आणि आग्नेय आशिया

## १३.१ भारत आणि श्रीलंका

श्रीलंका आणि भारत यांचा इतिहास प्राचीन काळापासून एकमेकांशी निगडित आहे. दीपवंश, महावंश, चूल्लवंश या तीन ग्रंथांमधून बुद्धपूर्व काळ आणि बुद्धोत्तर काळात भारतात आणि श्रीलंकेत होऊन गेलेले राजवंश, त्यांचे परस्परसंबंध आणि घडलेल्या ऐतिहासिक घटना यांची माहिती मिळते. या ग्रंथांना 'वंशग्रंथ' असे म्हटले जाते.

वंशग्रंथांमध्ये दिलेल्या माहितीनुसार, इसवी सनाच्या सुमारे सहाव्या शतकात श्रीलंकेत स्थापन झालेल्या पहिल्या राज्याचे नाव 'तांबपण्णी (ताम्रपर्णी)' असे होते. या राज्याचे दुसरे नाव 'राजरट' असे होते. ग्रीक इतिहासकारांनी श्रीलंकेचा उल्लेख 'तॅप्रोबेन' असा केला आहे. हे राज्य प्रस्थापित करणारा पहिला राजा विजय हा मूळचा भारताच्या वंग-कलिंग राज्यातील युवराज होता अशी आख्यायिका आहे. त्याच्या राज्यातून तो प्रथम सुप्पारक (सोपारा) येथे आला. तेथून तो श्रीलंकेत पोचला.

**श्रीलंकेतील प्राचीन राज्ये आणि महत्त्वाची बंदरे अभ्यासण्यासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.**
https://en.wikipedia.org/wiki/Anuradhapura_Kingdom#/media File:Important_ locations_of_ Anuradhapura_Kingdom.png

सम्राट अशोकाचा पुत्र थेर महिंद (महेंद्र) याचे श्रीलंकेची राजधानी अनुराधपूर येथील मिहिनथले येथे आगमन झाले. त्याने श्रीलंकेचा राजा 'देवानामपिय तिस्स' या राजाला बौद्ध धर्माची दिक्षा (पब्बज्जा/प्रवज्ज्या) दिल्याचे सविस्तर वर्णन वंशग्रंथांमध्ये आहे. उपदेश प्राप्त झाल्यानंतर राजा आणि त्याच्यासह आलेल्या सर्व प्रजाजनांनी बौद्ध धर्म स्वीकारला.


मिहिनथले येथे असलेला राजा देवानामपिय तिस्स याचा पुतळा

राजा देवानामपिय तिस्स याच्या धाकट्या भावाची पत्नी अनुला हिने भिक्खुनी बनण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा थेर महिंदांनी त्यांची बहीण थेरी संघमित्ता हिला भारतातून बोलवावे अशी सूचना केली. त्यानुसार थेरी संघमित्ता (संघमित्रा) श्रीलंकेला आली. येताना तिने बोधिवृक्षाची फांदी आणली होती. स्वतः राजा देवानामपिय तिस्स तिच्या स्वागतासाठी हजर होता. थेरी संघमित्ताने अनुलाला दिक्षा दिली. अनुला ही भिक्खुनी झालेली श्रीलंकेतील पहिली स्त्री होती. थेरी संघमित्ताने श्रीलंकेतील पहिले भिक्खुनी शासन (भिक्खुनी संघ) प्रस्थापित केले.

थेरी संघमित्ताच्या आगमनाचे स्मरण म्हणून श्रीलंकेमध्ये दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या पौर्णिमेला *'उंडुवप पोया' या नावाचा उत्सव साजरा केला जातो.

**'उंडुवप पोया' म्हणजे डिसेंबर महिन्यातील पौर्णिमा.*

### श्रीलंकेतील महत्त्वाची सांस्कृतिक स्थळे

**अनुराधपूर-मिहिनथले :** थेर महिंद आणि थेरी संघमित्ता यांच्या अनुराधपूरजवळच्या मिहिनथले येथील वास्तव्यामुळे बौद्ध धर्म श्रीलंकेत रुजला आणि वाढला.

**अनुराधपूर-मिहिनथले येथील महत्त्वाचे स्तूप :** 'कंटकचेतिय' हा मिहिनथले येथील प्राचीन स्तूपांपैकी एक आहे. स्तूपाजवळ असलेल्या कोरीव शिलालेखांमध्ये जवळचा पाण्याचा तलाव आणि जमीन यांवरील करातून

मिळणारा निधी या स्तूपाच्या देखभालीसाठी दिल्याचा उल्लेख आहे.

मिहिनथले येथील थेर महिंदांच्या शारीरिक धातूंवर (अस्थि) उभारलेला स्तूप 'अंबस्थल दगाबा' या नावाने ओळखला जातो.



थूपाराम स्तूप

थेरी संघमित्ताने श्रीलंकेत येताना तिच्याबरोबर गौतम बुद्धांच्या उजव्या खांद्याच्या अस्थि सोबत आणल्या होत्या. राजा देवानामपिय तिस्स याने अनुराधपूरमध्ये त्या अस्थिंवर 'थूपाराम' हा स्तूप उभारला. श्रीलंकेत अस्तित्वात असलेल्या स्तूपांमध्ये थूपाराम हा सर्वाधिक प्राचीन स्तूप आहे.

'बुद्धघोष' हा प्राचीन श्रीलंकेत होऊन गेलेला एक सुप्रसिद्ध भारतीय तत्त्वज्ञ होता. अनुराधपूरमधील 'महाविहार' येथे त्याचे वास्तव्य होते. 'विशुद्धिमग्ग' हा त्याने लिहिलेला ग्रंथ प्रसिद्ध आहे. विशुद्धिमग्ग हा ग्रंथ तिपिटक ग्रंथांच्या बरोबरीने महत्त्वाचा समजला जातो.

**पुलत्थीनगर (पोलन्नरुवा) :** चूल्लवंश या ग्रंथामध्ये पोलन्नरुवा या शहराचा उल्लेख 'पुलत्थीनगर' या नावाने केला आहे. इसवी सनाच्या दहाव्या शतकात चोळ सम्राट पहिला राजराजा याने श्रीलंकेवर आक्रमण केले आणि अनुराधपूर पूर्णपणे उद्‌ध्वस्त केले. त्याने पोलन्नरुवा येथे आपली राजधानी प्रस्थापित केली. त्याने पोलन्नरुवाचे नामकरण 'जननाथमंगलम' असे केले आणि तेथे एक शिवालय बांधले. त्यानंतर त्याने आपल्या राणीच्या स्मरणार्थ आणखी एक शिवालय बांधले. श्रीलंकेत असणाऱ्या हिंदू मंदिरांपैकी ही देवालये सर्वाधिक प्राचीन आहेत.

विजयबाहू याने चोळांचा पराभव करून श्रीलंकेतील त्यांचे वर्चस्व संपुष्टात आणले. त्याच्या वंशातील इसवी सनाच्या बाराव्या शतकात होऊन गेलेला पहिला पराक्रमबाहू हा राजा श्रीलंकेतील इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्याच्या काळापर्यंत श्रीलंकेतील बौद्ध संघ विस्कळित झाले होते. महाथेर कस्सप यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना एकत्रित करण्यावर पहिल्या पराक्रमबाहूने भर दिला.

श्रीलंकेतील रूहुना नावाच्या राज्याचा पहिल्या पराक्रमबाहूने पराभव केला. रूहुना राज्यातील राजवंशाच्या देखरेखीखाली असणारा गौतम बुद्धांचा दंतधातू 'निस्संक मल्ल' नावाच्या राजाने परत मिळवला. त्यावर पोलन्नरुवा येथे त्याने बौद्ध मंदिर बांधले.

मंदिराच्या मध्यभागी एक स्तूप आहे. स्तूपाच्या पायथ्याशी अर्धवर्तुळाकृती पायरीचा दगड हे श्रीलंकेच्या स्तूप स्थापत्याचे वैशिष्ट्य आहे. त्याला 'चंद्रशिला' असे म्हणतात. त्यावर हंस, हत्ती, घोडे आणि वेली यांच्या आकृती कोरलेल्या आहेत.



चंद्रशिला

पोल्लन्नरुवा येथील 'गलपोथा' (दगडावरील पोथी) हा एक वैशिष्ट्यपूर्ण अभिलेख आहे. हा ८.१७ मीटर लांबीच्या आणि १.३९ मीटर रूंदीच्या अखंड शिलापट्टावर कोरलेला लेख असून त्यामध्ये निस्संक मल्ल या राजाची कारकीर्द आणि पराक्रम यांचे वर्णन आहे. गलपोथाच्या एका बाजूस दोन हंसावलींच्या किनारींमध्ये गजलक्ष्मीची प्रतिमा कोरलेली आहे.

'श्री दलद मलिगव' या नावाने ओळखले जाणारे दंतधातूचे सध्याचे मंदिर कँडी या शहरात आहे. या मंदिराला युनेस्कोने जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा दिला आहे.



गलपोथा

**सहज जाता जाता :** गौतम बुद्धांच्या महापरिनिब्बानानंतर त्यांच्या अस्थींचे अवशेष भारतातील आणि बाहेरच्या देशांमधील बौद्ध संघांच्या हवाली करण्यात आले. अस्थींच्या या अवशेषांना 'धातू' असे म्हटले जाते. 'दीघ निकाय' या ग्रंथातील वर्णनानुसार गौतम बुद्धांचा डाव्या बाजूचा सुळा (दंतधातू) कलिंग देशाच्या राजाला मिळाला. हा दंतधातू पुढे श्रीलंकेत आला.

ज्याच्याकडे दंतधातू असेल त्याला राज्य करण्याचा दैवी अधिकार आहे, अशी श्रद्धा श्रीलंकेतील राजघराण्यांमध्ये रुजली. त्यामुळे सत्तेवर असलेल्या राजांनी तो आपल्या राजवाड्याच्या परिसरातच राहावा यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे दंतधातूचे स्थान सतत बदलत राहिले.

**दाम्बुल्ल आणि सिगिरिया :** श्रीलंकेतील दाम्बुल्ल येथील बौद्ध लेणी जागतिक सांस्कृतिक वारसा म्हणून जाहीर झालेली आहेत. या ठिकाणी असलेल्या पाच लेण्यांच्या अंतर्भागात गौतम बुद्ध आणि बोधिसत्त्व यांच्या मूर्तींबरोबर छतांवर काढलेली चित्रे आहेत.

दाम्बुल्ल शहराच्या जवळ असलेल्या सिगिरिया येथील पर्वतावर एका प्रचंड मोठ्या खडकावर बांधलेला किल्ला आणि राजवाडा होता. त्या खडकात राजवाड्याच्या प्रवेशद्वारापाशी कोरलेली सिंहाची एक प्रचंड मूर्ती आहे. त्यावरून या ठिकाणाचे नाव 'सिगिरिया' असे पडले. सिगिरिया येथील भित्तिचित्रांच्या शैलीची तुलना अजिंठा येथील भित्तिचित्र शैलीशी केली जाते.



सिगिरिया येथील भित्तिचित्र

**सहज जाता जाता :** इसवी सनापूर्वी तिसरे शतक ते इसवी सनाचे पहिले शतक या काळातील श्रीलंकेमध्ये मिळालेले कोरीव लेख अशोककालीन ब्राह्मी लिपीत कोरलेले आहेत. अभ्यासकांच्या मते त्यातूनच हळूहळू आजची सिंहल लिपी विकसित होत गेली.

'ललितविस्तर सूत्र' या बौद्ध ग्रंथात एकूण ६४ भारतीय लिपींची यादी दिली आहे. त्यामध्ये 'ब्राह्मी' या लिपीचा उल्लेख आहे. ब्राह्मी लिपीपासून पुढे श्रीलंका आणि आग्नेय आशियातील अनेक लिपी विकसित झाल्या.

## १३.२ भारत आणि आग्नेय आशिया

आग्नेय आशियात प्रस्थापित झालेल्या भारतीयांच्या वसाहती आणि राज्ये यांची माहिती देणारे भारतीय साहित्य फारसे उपलब्ध नसले तरी चिनी सम्राटांच्या दरबारी नोंदींमध्ये या संदर्भातील माहिती उपलब्ध आहे. प्राचीन भारतीय साहित्यात 'सुवर्णभूमी' असा या प्रदेशाचा उल्लेख आढळतो.

आग्नेय आशियातील देशांशी भारताचे व्यापारी संबंध इसवी सनापूर्वी पहिले शतक ते इसवी सनाचे पहिले शतक या काळात सुरू झाले. भारतीय व्यापाऱ्यांसाठी मलाक्काच्या सामुद्रधुनीमार्गे येऊन चिनी समुद्रात प्रवेश करण्यासाठी मलाया द्वीपकल्प हा सोईचा

बिंदू ठरला. मलाया द्वीपकल्पाच्या पश्चिमेकडील किनाऱ्यावर माल उतरवून तो पूर्व किनाऱ्याकडे नेणे आणि तो परत जहाजावर चढवणे हे संपूर्ण समुद्राला वळसा घालून जाण्यापेक्षा सोईचे होते. समुद्रमार्गाने चालणारा हा व्यापार इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या शेवटी चोळ राजांच्या राजवटीत लक्षणीयरित्या वृद्धिंगत झाला.

'आग्नेय आशिया' ही संज्ञा दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळात प्रचारात आली. बौद्ध ग्रंथांमध्ये सुवर्णभूमीचा उल्लेख आहे. आग्नेय आशियाचे अभ्यासक त्या प्रदेशाची भौगोलिक वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्याचे दोन विभाग करतात : **१. मुख्य भूभाग** (या प्रदेशाचा उल्लेख इंडो-चीन या नावानेही केला जातो) - यामध्ये म्यानमार, थायलंड, कंबोडिया, लाओस, व्हिएतनाम हे देश आणि मलेशियाचा पश्चिम भाग यांचा समावेश होतो. **२. समुद्री प्रदेश** - म्हणजे मलाया द्वीपसमूह ज्यामध्ये मलेशियाचा पूर्व भाग आणि इंडोनेशियाचा समावेश होतो. या एवढ्या मोठ्या प्रदेशाचा समावेश आग्नेय आशियामध्ये केला जात असला तरी तेथील संस्कृती आणि इतिहास यांचा अभ्यास करत असताना तेथील स्थानिक वैविध्यांचा विसर पडणार नाही याची काळजी घेणे आवश्यक ठरते.

> **आग्नेय आशिया - संदर्भासाठी अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.**
>
> (१) http://www.world-maps.co.uk/continent-map-ofsouth-east-asia.htm
>
> (२) https://en.wikipedia.org/wiki/Khmer_Empire#/media/File:Map-ofsoutheast-asia_900_CE.png)

भारतातील लोकांचा आग्नेय आशियातील विविध प्रदेशांशी असलेला संपर्क इसवी सनापूर्वी दुसरे शतक ते इसवी सनाचे दुसरे शतक या कालखंडात व्यापाराच्या निमित्ताने वाढीस लागला होता. जहाजांवरून महिनोन्महिने प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांबरोबर असलेल्या लवाजम्यात पुरोहित, भिक्खू, नशीब अजमावून पाहण्यासाठी निघालेले मुशाफीर, एखाद्या राजघराण्यातील महत्त्वाकांक्षी सदस्य असे विविध प्रकारचे लोक असत. या लोकांमार्फत आग्नेय आशियात भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला. इतकेच नव्हे तर त्यांतील काहींनी तिथे स्वतंत्र राज्येही प्रस्थापित केली. आग्नेय आशियात प्रसृत झालेल्या भारतीय संस्कृतीच्या खुणा आजही पहायला मिळतात.

**म्यानमार :** 'म्यानमार' हा भारताच्या ईशान्य सीमेलगत असलेला शेजारी देश आहे. 'ब्रह्मदेश' हे या देशाचे पूर्वीचे नाव आहे. इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकात उत्तर आणि मध्य म्यानमारमध्ये 'प्यू' या नावाने ओळखली जाणारी नगरराज्ये अस्तित्वात आलेली होती. काही प्यू नगरे नव्याने वसली. त्यामध्ये हालीन आणि श्रीक्षेत्र ही नगरे महत्त्वाची होती.

श्रीक्षेत्र (ब्रिटिशकाळात 'प्रोम' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आणि सध्या 'प्येइ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शहराजवळ) हे प्यू नगरांमध्ये विस्ताराने सर्वांत मोठे असलेले नगर होते. प्रचलित आख्यायिकांच्या अनुसार श्रीक्षेत्र या राज्यांचे संस्थापक असलेले दोन भाऊ हे गौतम बुद्धांच्या शाक्य कुळातील होते. इसवी सनाच्या पहिल्या शतकात म्यानमारमध्ये 'पगान' (बगान) हे राज्य उदयाला आले. इसवी सनाच्या अकराव्या शतकात त्याचे साम्राज्यात रूपांतर झाले आणि त्या साम्राज्यात श्रीक्षेत्रसह सर्व प्यू नगरराज्ये विलीन झाली.

पगान साम्राज्याचा संस्थापक 'अनव्रथ' हा म्यानमारच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ राज्यकर्ता मानला जातो. उत्तर आणि दक्षिण म्यानमारचे एकत्रीकरण करून आधुनिक म्यानमारच्या राष्ट्रीय अस्मितेचा पाया घालण्याचे श्रेय त्याला देण्यात येते. कंबोडियातील ख्मेर सत्तेच्या वाढत्या वर्चस्वाला त्याने पायबंद घातला. त्याच्या कारकिर्दीत श्रीलंका आणि आग्नेय आशियात क्षीण होत चाललेल्या थेरवादी बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन झाले.

प्यू नगरराज्यांमधील हालीन, बेइक्थानो आणि श्रीक्षेत्र या तीन नगरांभोवती असलेल्या तटभिंतींचे विटकाम, खंदक यांचे अवशेष अजूनही पाहण्यास मिळतात. तेथे करण्यात आलेल्या उत्खननांमध्ये तत्कालीन वास्तू, स्तूप, दफनभूमी आणि जलव्यवस्थापनाशी संबंधित असलेली बांधकामे यांचे अवशेष उजेडात आलेले आहेत. या तीनही नगरांच्या अवशेषांना जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा देण्यात आला आहे.

इसवी सनाच्या सहाव्या ते दहाव्या शतकाच्या दरम्यान बांधला गेलेला याँगान (रंगून) येथील 'श्वेडगॉन पॅगोडा' हा म्यानमारमधील स्तूपबांधणीचा एक उत्कृष्ट नमुना समजला जातो. म्यानमारमधील दोन व्यापारी बंधू भारतात आले असता त्यांची भेट गौतम बुद्धांशी झाली होती. त्या वेळी त्यांना गौतम बुद्धांकडून त्यांच्या मस्तकाचे आठ केस मिळाले होते. मायदेशी परतल्यावर त्यांनी ते राजाच्या हवाली केले आणि राजाने त्यावर जो पॅगोडा बांधला, त्याला 'श्वेडगॉन पॅगोडा' हे नाव मिळाले. हा पॅगोडा सोन्याच्या पत्र्यांनी मढवलेला आहे.



श्वेडगॉन पॅगोडा

पगान साम्राज्याचा इसवी सनाच्या अकराव्या ते बाराव्या शतकातला सम्राट क्यांझित्था याच्या कारकिर्दीत बांधले गेलेले 'आनंद मंदिर' ही आणखी एक महत्त्वाची वास्तू आहे. ती भारतीय आणि पगान स्थापत्यशैलीच्या संमिश्र बांधणीचा उत्कृष्ट नमुना आहे.



आनंद मंदिर

**थायलंड :** प्राचीन काळी थायलंडचे रहिवासी त्यांच्या देशाचा उल्लेख 'मुएंग थाइ' असा करत असत. परंतु बाहेरील जगामध्ये मात्र तो 'सयाम' या नावाने ओळखला जात असे. विसाव्या शतकात त्याचे नाव 'थायलंड' असे बदलण्यात आले. थायलंडमध्ये इसवी सनाच्या सहाव्या ते अकराव्या शतकात मॉन लोकांचे राज्य होते. त्याचे नाव होते 'द्वारावती'. द्वारावतीच्या काळात थायलंडमध्ये भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला. मॉन संस्कृतीच्या घडणीमध्ये भारतीय शिल्प, साहित्य, नीतिशास्त्र आणि दंडनीती या क्षेत्रांमधील परंपरांचा मोठा वाटा होता. द्वारावती हे राज्य छोटे आणि आग्नेय आशियातील इतर राज्यांच्या तुलनेत दुर्बल होते. लेखन, कला, प्रशासन, धर्म आणि शास्त्र या क्षेत्रांमधील ज्ञानाच्या इतर राज्यांमध्ये झालेल्या विकासाचे श्रेय मॉन लोकांकडे जाते. थायलंडमधील लोप बुरी (लाओ पुरी), अयुथ्था (अयोध्या) यांसारख्या शहरांच्या जवळ द्वारावती कालखंडातील शिल्प आणि स्थापत्य यांचे अवशेष सापडले आहेत.



द्वारावतीचे प्रातिनिधिक शिल्प

द्वारावती शिल्पशैलीवर भारतीय शिल्पशैलीचा प्रभाव दिसतो. त्यामध्ये प्रामुख्याने बुद्धमूर्तींचा समावेश असला तरी शिवलिंग आणि विष्णूमूर्तीही सापडलेल्या आहेत. कंबोडियातील शिल्पशैलीचा उगम द्वारावतीच्या शिल्पशैलीत असावा, असे मानले जाते.

इसवी सनाच्या चौदाव्या शतकात थायलंडमध्ये 'अयुथ्थ्या' नावाचे राज्य उदयाला आले. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात म्यानमारने केलेल्या आक्रमणात अयुथ्थाचा संपूर्ण पाडाव झाला. आक्रमकांनी अयुथ्था शहर जाळले आणि तेथील कलाकृती, ग्रंथालये, मंदिरे इत्यादी सर्व आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. अयुथ्थाच्या राजांच्या नावामागे 'राम' हा उपसर्ग जोडलेला दिसतो. त्याचे कारण तिथे रामचरित्राला मिळालेली लोकप्रियता आहे. थाइ रामायणाची स्वतंत्र परंपरा आहे. तिला 'रामाकिएन' (राम आख्यान) असे म्हटले जाते. रामाकिएन मधील कथा थायलंडमधील कलेच्या शिल्प, लोकसंगीत, नृत्य, नाट्य या सर्व माध्यमांमधून जपलेल्या आहेत.

**व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया :** युरोपियन वसाहतींच्या काळात व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया या तीन देशांना मिळून 'इंडो-चीन' असे नाव दिले गेले.

इसवी सनाचे आठवे ते बारावे शतक या कालखंडात कंबोडियामध्ये मॉन आणि ख्मेर वंशाच्या लोकांचे राज्य होते. ख्मेर साम्राज्याचा उदय कंबोडियामध्ये झाला.

**नकाशाच्या संदर्भासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.**
https://commons.wikimedia.org/wiki/
File:Bandovietnam-final-fillscale.svg)

**१. व्हिएतनाम 'फुनान' :** हे व्हिएतनाममधील मेकाँग नदीच्या मुखाच्या प्रदेशातील प्राचीन राज्य होते. फुनानची माहिती प्रामुख्याने चिनी साहित्यातून मिळते. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात चीनमध्ये हान नावाचे घराणे राज्य करत होते. ते लयाला गेल्यानंतर चीनच्या साम्राज्याचे तीन तुकडे झाले. त्यांतील दक्षिणेकडच्या राज्याला रेशीम मार्गापर्यंत पोचण्यासाठी पर्याय उरला नाही. तेव्हा तेथील राजाने समुद्री मार्गाचा पर्याय शोधण्यासाठी काही लोक पाठवले. त्यांना मेकाँग* नदीच्या मुखाच्या प्रदेशात एक राज्य प्रस्थापित असलेले आढळले. त्यास त्यांनी 'फुनान' असे नाव दिले. त्यांच्या वर्णनानुसार फुनानमध्ये तटबंदीयुक्त शहर, राजवाडा, प्रस्थापित करप्रणाली, कायदे, लिखित नोंदी करण्याची पद्धत आणि कौशल्यावर आधारित व्यवसाय करणारा कारागीरवर्ग होता. हवाई छायाचित्रणाच्या आधारे या वर्णनाला दुजोरा मिळाला आहे. फ्रेंच पुरातत्त्वज्ञ लुई मेलरे याने केलेल्या उत्खननात विटांमध्ये बांधकाम केलेल्या मंदिरांचे अवशेष, अलंकार घडवण्याचे कारखाने आणि राहण्याची घरे यांचे येथे अवशेष मिळाले. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील रोमन नाणीही मिळाली.

**मेकाँग नदी तिबेटच्या पठारावर उगम पावून, चीनच्या युन्नान प्रांतातून, म्यानमार, लाओस, थायलंड, कम्बोडिया आणि शेवटी व्हिएतनाम अशी वाहत येऊन दक्षिण चीनच्या समुद्राला मिळते.*

**२. चंपा :** व्हिएतनामच्या किनारी प्रदेशात 'चंपा' हे प्राचीन राज्य होते. 'चंपा' राज्यात अनेक ठिकाणी ब्राह्मी लिपीत कोरलेले संस्कृत लेख मिळाले आहेत. चंपा म्हणजे 'चामवंशीय' लोकांचे राज्य. तेथील शहरांची* नावे इंद्रपूर, अमरावती, विजय, कौठार, पांडुरंग अशी होती. विजय हे शहर चंपा राज्याची राजधानी होते. कोरीव लेखांमध्ये तेथील राजे आणि राण्या यांची नावे आणि त्यांनी बांधलेल्या हिंदू दैवतांच्या मंदिरांचे, विशेषतः शिवमंदिरांचे उल्लेख सापडतात. त्याचबरोबर लाकडी बुद्धमूर्तीही मिळाल्या आहेत. त्यावरून व्हिएतनाममध्ये व्यापारी केंद्र असलेली फुनानसारखीच इतर नगरराज्ये अस्तित्वात होती आणि तेथून विविध वस्तूंची आयात-निर्यात होत असे, हे स्पष्ट होते.

**चंपा या राज्यातील नगरांच्या नावासाठी नकाशा पहा :*
*https://upload.wikimedia.org/wikipedia/*
*commons/4/45/VietnamChampa1.gif*

इसवी सनाच्या चौथ्या ते चौदाव्या शतकाच्या कालखंडात चंपा राज्यामध्ये शैव मंदिरे बांधली गेली. ही मंदिरे 'माइ सान' नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका दरीमध्ये आहेत. त्यांतील 'भद्रेश्वर' मंदिर महत्त्वाचे समजले जाते. माइ सान येथे एके काळी ७० हून अधिक मंदिरे होती. या मंदिरांच्या प्रांगणात संस्कृत आणि चाम भाषेत कोरलेल्या लेखांचे दगडी पट्ट उभारलेले आहेत. याच परिसरात राजघराण्यातील व्यक्तींची दफनस्थळे आहेत. हा परिसर राजघराण्यातील लोकांच्या धार्मिक

प्रसंगांसाठी राखीव होता, असे दिसते. माइ सान येथील मंदिरांच्या परिसराला जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा लाभलेला आहे.

माइ सानची मंदिर स्थापत्यशैली वैशिष्ट्यपूर्ण होती. शिखरांची उभारणी मेरू पर्वताच्या संकल्पनेवर आधारलेली होती.



'माइ सान' येथील मंदिराच्या शिखरावरील शिल्प

व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया या तीन देशांत सुमारे वीस वर्षे सुरू असलेल्या युद्धाला 'व्हिएतनाम युद्ध' म्हणून ओळखले जाते. या युद्धात माइ सानचा परिसर उद्ध्वस्त झाला.

**३. लाओस :** हा देश भूवेष्टित आहे. लाओसचे अधिकांश लोक मूळचे दक्षिण चीनमधून आलेले 'लाओ' वंशाचे लोक आहेत. लाओसमधील राज्याचे नाव 'लाओ सांग' असे होते. हे राज्य इसवी सनाच्या चौदाव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत अस्तित्वात होते. एकोणिसाव्या शतकात थायलंडने केलेल्या आक्रमणापुढे लाओ सांगचा टिकाव लागला नाही. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लाओसमधील व्हिएनशिएन येथे पुन्हा एकदा फ्रेंच लोकांनी त्यांचे प्रशासकीय केंद्र प्रस्थापित केले.

आग्नेय आशियातील इतर देशांप्रमाणेच लाओसमध्येही बौद्ध धर्म प्रमुख आहे. तेथील सांस्कृतिक आणि साहित्यिक जीवनात बुद्धचरित्र आणि रामायण यांच्याशी संबंधित कथांचा प्रभाव पहायला मिळतो. विशेषतः शिल्पकला आणि नृत्य-नाट्य या माध्यमांमध्ये बुद्धचरित्र आणि रामायणातील कथासूत्रांचे सादरीकरण केलेले पहायला मिळते. सोळाव्या शतकात लाओसमध्ये रचले गेलेले 'सान सिनसे' नावाचे एक महाकाव्य केवळ लाओसमध्येच नव्हे तर थायलंडमध्येही लोकप्रिय आहे. त्याच्या कथासूत्रामध्ये आणि रामायणाच्या कथासूत्रामध्ये साधर्म्य आहे.

**४. कंबोडिया :** याचे प्राचीन नाव 'कंबुजदेश' असे होते. त्याचा इतिहास तेथील मंदिरांच्या प्रांगणांमध्ये असणाऱ्या कोरीव लेखांच्या आधारे समजतो. हे लेख संस्कृत आणि ख्मेर भाषेत आहेत. कंबोडियात सर्वप्रथम प्रस्थापित झालेल्या राज्याचे नाव 'चेन्ला' असे होते. तेथील लोक 'ख्मेर' वंशाचे होते. कंबोडियातील भारतीय संस्कृतीचा प्रभाव चेन्ला काळापासून दिसून येतो. चेन्ला राज्याच्या संस्थापकाचे नाव दुसरा 'जयवर्मन' असे होते. इसवी सन ८०२ मध्ये त्याचा राज्याभिषेक झाला. त्याच्या राजधानीचे नाव 'हरिहरालय' होते.

चेन्ला राज्याच्या राजांनी पुढील ५०० वर्षांत व्हिएतनामपासून म्यानमार आणि उत्तरेला चीनपर्यंत राज्याचा विस्तार केला. हे साम्राज्य 'ख्मेर साम्राज्य' म्हणून ओळखले जाते. सातवा 'जयवर्मन' या राजाच्या कारकिर्दीनंतर ख्मेर साम्राज्याला उतरती कळा लागली आणि इसवी सनाच्या पंधराव्या शतकात थायलंडमधील अयुथ्थाच्या राजांनी ख्मेर साम्राज्याचा पूर्ण पाडाव केला.

इसवी सनाच्या अकराव्या शतकातील दुसरा सूर्यवर्मन आणि बारा-तेराव्या शतकांतील सातवा जयवर्मन यांची कारकीर्द कंबोडियातील मंदिरस्थापत्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची होती. दुसऱ्या सूर्यवर्मनने 'यशोधरपूर' या राजधानीच्या शहरात जगविख्यात 'अंकोरवट' हे विष्णुमंदिर बांधले. त्याचे क्षेत्रफळ सुमारे ५०० एकर म्हणजेच सुमारे २ चौरस किलोमीटर इतके आहे. मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेला असून मंदिराभोवती २०० मीटर रुंदीचा प्रचंड मोठा खंदक आहे. मंदिराच्या कोरीव शिल्पांमध्ये आग्नेयेकडील भिंतीवर असलेले समुद्रमंथनाचे शिल्प प्रसिद्ध आहे.



अंकोरवट मंदिर

सूर्यवर्मनच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी चंपाच्या राजाने अंकोरवटवर हल्ला केला आणि अंकोरवटची नासधूस केली. पुढे अंकोरवटचे रूपांतर बौद्‌ध मंदिरामध्ये झाले.

सातव्या जयवर्मनने ख्मेर साम्राज्याची आधीची राजधानी यशोधरपूरपासून जवळच 'अंकोरथॉम' ही नवी राजधानी बांधली. त्याने बौद्‌ध धर्माचा स्वीकार केला होता. अंकोरथॉम शहराचे नियोजन, जलव्यवस्थापन आणि स्थापत्य यांमध्ये ख्मेर शैलीच्या परिपक्वतेचा प्रत्यय येतो. अंकोरथॉमचा मध्यवर्ती बिंदू म्हणजे 'बयोन मंदिर'. बयोन मंदिर हे मेरू पर्वताचे प्रतीक आहे. बयोन मंदिररूपी मेरू पर्वताला रवीच्या स्वरूपात मध्यवर्ती ठेवून, समुद्रमंथन करणाऱ्या देव आणि दानव यांच्या शिल्पाकृती मंदिराच्या दक्षिणेकडील प्रवेशमार्गाच्या दोन्ही बाजूंना पहायला मिळतात. शहराच्या भोवती असणाऱ्या खंदकातील पाणी 'ईस्ट बॅरे' आणि 'वेस्ट बॅरे' या नावांच्या दोन जलाशयांमधून येते. याच जलाशयांमधून अंकोरथॉम, अंकोरवट आणि त्यांच्या परिसरातील इतर अनेक मंदिरांना पाणीपुरवठा होत असे. अंकोरथॉमच्या प्रवेशद्‌वारावरील शिखरे त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीसाठी प्रसिद्‌ध आहेत. ही शिखरे किंचित स्मित करणाऱ्या मानवी चेहऱ्याच्या आकाराची आहेत. आकाराने प्रचंड असणाऱ्या या चेहऱ्यांची बांधणी अनेक दगड वापरून केलेली आहे. त्यांतील प्रत्येक दगडाचे कातीव काम चेहऱ्याच्या आकारानुसार करून घेऊन, मग ते दगड एकमेकांमध्ये बसवून, हे चेहरे साकारलेले आहेत.

अंकोरवट, अंकोरथॉम आणि त्यांच्याभोवतीचा परिसर हा युनेस्कोने जागतिक सांस्कृतिक वारसा म्हणून जाहीर केलेला आहे.

**मलेशिया आणि इंडोनेशिया :** युरोपीय लोकांच्या आगमनाआधी मलेशियामध्ये तीन प्राचीन राज्ये होऊन गेली. वायू पुराणात 'मलयद्‌वीप' या नावाने मलेशियन द्‌वीपकल्पाचा उल्लेख केलेला आढळतो. सातव्या शतकात होऊन गेलेला इ-त्सिंग/यि-जिंग या चिनी बौद्‌ध भिक्खूने 'मलायु' राज्याला भेट दिली होती. टॉलेमीने त्याचा उल्लेख 'मलेउ कोलान' आणि 'गोल्डन केर्सनीझ (सुवर्णद्‌वीप)' असा केला आहे. तंजावर येथील बृहदीश्वर मंदिरातील कोरीव लेखात त्याचा उल्लेख 'मलैयुर' असा केलेला आहे. चोळ राजा राजेंद्र याने पराभूत केलेल्या राज्यांपैकी ते एक राज्य होते. चीनच्या दरबारी दप्तरांमध्येही मलायुचा उल्लेख आढळतो.

**१. श्रीविजय :** हे राज्य आग्नेय आशियातील एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या राज्यांमध्ये प्रबळ ठरले. या राज्याचा उगम सुमात्रामध्ये झाला. मलायु आणि त्याच्या शेजारची तुलनेने दुर्बळ असलेली राज्ये हळूहळू श्रीविजय राज्यामध्ये समाविष्ट झाली. अकराव्या शतकात चोळांनी केलेल्या आक्रमणाला तोंड देताना श्रीविजय राज्य दुर्बळ झाले. चौदाव्या शतकात मलायुचा शेवटचा राजा 'परमेश्वरन' उर्फ 'इस्कंदर शाह' याने मलायातील पहिल्या सुलतानशाही राज्याची स्थापना केली.

**२. मजपहित :** तेराव्या शतकामध्ये पूर्व जावामध्ये 'मजपहित' नावाचे राज्य उदय पावले. हे भारतीय संस्कृतीचा प्रभाव असणारे शेवटचे राज्य होते. या राज्याच्या संस्थापकाचे नाव विजय असे होते. या राजाने कुबलाई खानाला जावामधून हाकलून देण्यात यश मिळवले आणि इंडोनेशियातील जावा, बाली आणि इतर

**अधिक माहितीसाठी :** इ-त्सिंग/यि-जिंग भारतात येण्यापूर्वी आणि चीनला परत जाताना दोन्ही वेळा इंडोनेशियातील सुमात्रा या बेटावर थांबला होता. तिथे राहून तो संस्कृत व्याकरण शिकला होता. सुमात्रातील राज्याचा उल्लेख त्याने 'शिली फोशी' म्हणजे श्रीविजय या नावाने केला आहे. तिथल्या राजाने त्याला मलायुला पाठवले होते. मलायु येथे तो दोन महिने राहिला. त्याच्या परतीच्या प्रवासातही तो मलायु येथे गेला होता. परंतु मधल्या वीस वर्षांच्या काळात मलायुचे नाव श्रीविजय झाले असल्याचे त्याने नमूद केले आहे. श्रीविजयमध्ये एक हजाराहूनही अधिक बौद्ध भिक्खू संस्कृत शिकण्यासाठी राहत असल्याचेही त्याने नमूद केले आहे.

**अधिक माहितीसाठी :** सुमात्रामध्ये अनेक कोरीव लेख मिळालेले आहेत. ते प्राचीन मलायु भाषेत असून त्यासाठी पल्लव ब्राह्मी लिपीचा (तमिळ ब्राह्मीचे एक रूप) वापर केला आहे.

काही बेटांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करून मजपहित राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. पंधराव्या आणि सोळाव्या शतकामध्ये उदयाला आलेल्या इस्लामी राज्यांमुळे मजपहितचे अस्तित्व हळूहळू संपुष्टात आले.

**३. शैलेन्द्र :** या जावामधील राज्याचे राज्यकर्ते भारतातून आले होते, असे मत काही भारतीय इतिहासकारांनी मांडले होते. परंतु त्याबद्दल एकमत नाही. इसवी सनाच्या आठव्या ते नवव्या शतकात शैलेन्द्र सत्ता भरभराटीला आली. शैलेन्द्र राजे बौद्ध धर्माचे अनुयायी होते. त्यांनी अनेक बौद्ध मंदिरे आणि स्तूप बांधले. त्यात मध्य जावातील बोरोबुदुरचा स्तूप स्थापत्य, शिल्पकला आणि बौद्ध तत्त्वज्ञानाची अभिव्यक्ती या सर्वच दृष्टीने अद्‌वितीय आहे. त्याला जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा देण्यात आला आहे.

शैलेंद्र काळात मध्य जावातील डिएंगच्या पठारावर बांधलेला हिंदू मंदिरांचा समूह 'डिएंग मंदिरे' या नावाने ओळखला जातो.

**४. मतराम :** 'मतराम' नावाची एक समकालीन सत्ता जावाच्या पूर्व भागात होती. संजय नावाचा राजा या राज्याचा संस्थापक होता. मतराम राजवटीच्या काळात 'महाभारत' आणि 'हरिवंश' या ग्रंथांची जावानीज भाषेत भाषांतरे झाली. प्राचीन जावानीज भाषेतील काव्यरचना 'शार्दूलविक्रिडित' सारख्या संस्कृत वृत्तामध्ये बांधलेल्या आहेत. त्यांना 'काकविन' असे म्हटले जाते.

इंडोनेशियातील 'वायांग' या नावाने ओळखला जाणारा छायानाट्याचा खेळ विशेष प्रसिद्ध आहे. हा खेळ विशिष्ट पद्‌धतीने बनवलेल्या कातडी किंवा लाकडी पुतळ्या वापरून केला जातो. त्यामध्ये महाभारत आणि रामायणामधील कथा सादर केल्या जातात. रामायण, महाभारतातील कथांच्या आधारे कलावंतांकडून रंगमंचावर सादर केले जाणारे नृत्यनाट्यही 'वायांग' या नावाने ओळखले जाते.



**वायांग छायानाट्य**

इंडोनेशियात हिंदू, विशेषतः शैव संप्रदायाची मंदिरेही बांधली गेली. त्यामध्ये प्रांबनान येथील मंदिर समूह खूप महत्त्वाचा मानला जातो. या समूहातील मंदिरांना जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यांतील प्रमुख मंदिर 'चंडी* प्रांबनान' किंवा 'चंडी लारा/रारा जोंग्रांग' या नावाने ओळखले जाते. ते मतरामचा राजा दक्ष याने बांधले. हे मंदिर शिवाचे असून त्यामध्ये दुर्गा देवीची एक सुंदर मूर्ती आहे. तिला स्थानिक लोक 'लारा जोंग्रांग' असे म्हणतात.

*'चंडी' म्हणजे मंदिर.*

अशा रीतीने या आणि याआधीच्या पाठात भारताबाहेरील देशांमध्ये त्या त्या देशातील संस्कृतींच्या घडणीत भारतीय संस्कृतीने महत्त्वाची भूमिका बजावली, याचा इतिहास आपण पाहिला. बौद्ध धर्माचा प्रसार आणि व्यापार यांच्यामुळे भारतीय संस्कृतीच्या भारताबाहेरच्या प्रसारास सुरुवात झाली. त्या इतिहासाने इसवी सनाच्या सुरुवातीपासून मध्ययुगापर्यंतचा कालखंड व्यापलेला आहे.

**अधिक माहितीसाठी :** बौद्ध तत्त्वज्ञानानुसार विश्वाच्या अस्तित्वाच्या तीन पातळ्या असतात : (१) कामधातू (इच्छारूपी बंध) (२) रूपधातू (आकाररूपी आणि नामरूपी बंध) (३) अरूपधातू (बंधमुक्तता). बोरोबुदुरच्या स्तूपाची रचना या तीन पातळ्यांच्या संकल्पनेवर आधारलेली आहे. पहिल्या दोन पातळ्यांवर क्रमाने लहान होत जाणारे चौथरे आहेत. प्रत्येक चौथऱ्याभोवती शिल्पाकृती असून कोनाड्यांमध्ये बुद्धमूर्ती आहेत. अंतिम पातळीवर तीन वर्तुळाकृती चौथरे आणि त्यांच्या कडेने जाळीदार स्तूप आहेत. त्या स्तूपांच्या आत बुद्धमूर्ती आहेत. सर्वांत शेवटच्या वर्तुळाकृती चौथऱ्यावर भरीव स्तूप आहे. अत्यंत भव्य असा हा स्तूप इसवी सन ८०० च्या सुमारास बांधला गेला.



**बोरोबुदुर स्तूप**

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. 'बुद्धघोष' हा प्राचीन श्रीलंकेत होऊन गेलेला एक सुप्रसिद्ध .......... होता.
   (अ) विचारवंत (ब) तत्त्वज्ञ
   (क) राजा (ड) धर्मगुरू

२. पगान साम्राज्याचा संस्थापक......... हा होता.
   (अ) क्यांझित्था (ब) अनव्रथ
   (क) अयुथ्था (ड) जयवर्मन

३. कंबोडियाचे प्राचीन नाव ........होते.
   (अ) कंबुज देश (ब) लाओस,
   (क) अंकोरवट (ड) सुमात्रा

**(ब) 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. म्यानमारमधील स्तूप बांधणीचा उत्कृष्ट नमुना | श्वेडगॉन पॅगोडा |
| २. चंपा राज्यामधील शैव मंदिरे | माइ सान |
| ३. कंबोडियातील जगविख्यात विष्णुमंदिर | अंकोरवट |
| ४. अंकोरथॉमचा मध्यवर्ती बिंदू | डिएंग मंदिरे |

**(क) नावे लिहा.**

१. सम्राट अशोकाचा पुत्र –
२. लाओसमधील प्राचीन राज्याचे नाव–
३. चामवंशीय लोकांचे राज्य –
४. मलायुचा शेवटचा राजा–

**प्र.२ टीपा लिहा.**

१. चेन्ला राज्य
२. अंकोरवट विष्णुमंदिर
३. मजपहित राज्य
४. चंपा राज्य

**प्र.३ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. थायलंडमधील भारतीय संस्कृतीचा प्रसार स्पष्ट करा.
२. म्यानमार आणि भारत यामधील सांस्कृतिक संबंधांविषयी माहिती लिहा.

**उपक्रम**

पाठामध्ये आलेल्या जागतिक वारसास्थळांची नावे शोधा. आंतरजालाच्या (इंटरनेट) मदतीने चित्रे मिळवा. वास्तूचे नाव, ठिकाण, देश यांचा तक्ता तयार करा.